दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-४

अंक-३०

## किती दिवस दिव्यातील सामान्य नागरिक भीतीच्या छायेखाली राहणार?

# दिव्यातील अनधिकृत घरे अधिकृत करून नागरिकांना दिलासा द्या! -ज्योती पाटील



## मानवतेच्या दृष्टिकोनातून विचार व्हावा, ठाकरेंच्या शिवसेनेच्या ज्योती पाटील यांची पालिका व राज्य शासनाला विनंती

***दिवा :- दिवा शहरातील सर्वसामान्य जनतेच्या मनातील भीती काढून टाकण्यासाठी महापालिका आणि राज्य शासनाने शहरातील सर्व अनधिकृत इमारती नाममात्र फी आकारून अधिकृत कराव्यात व नागरिकांना भीतीच्या सावटाखाली ठेवू नये अशी आग्रही मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या दिवा शहर महिला संघटिका ज्योती पाटील यांनी पालिकेकडे केली आहे.***

आपल्या हक्काचे घर तुटेल या भीतीतून आज दिवा शहरातील तीन इमारतीमधील रहिवासी आक्रोश करत आहेत. मागील १८ वर्षांपासून वास्तव्य करणाऱ्या आणि पाणी बिल, लाईट बिल, प्रॉपर्टी टॅक्स भरणाऱ्या नागरिकांना महापालिका एका दिवसात रस्त्यावर आणणार असेल तर याची दुसरी बाजू देखील महापालिकेने समजून घ्यायला हवी.माणुसकीच्या दृष्टिकोनातून दिवा शहरातील सर्वसामान्य गरीब कुटुंबातील नागरिकांना न्याय व दिलासा देण्यासाठी धोरण आखणी गरजेची आहे असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

शहरातील सर्वसामान्य गरीब जनतेला न्याय देण्यासाठी दिवा शहरातील सर्व अनधिकृत इमारती या नाममात्र फी आकारून अधिकृत कराव्यात व दिवा शहरावरील अनधिकृत शिक्का पुसून टाकावा अशी आग्रही विनंती ज्योती पाटील यांनी राज्य शासन आणि महापालिकेकडे केले आहे. अनधिकृत बांधकामाबाबत महापालिकेचे धोरण हे स्पष्ट नसून जर तुमच्या कार्यक्षेत्रात सर्वसामान्य गरीब कुटुंबातील नागरिकांनी घर घेतली असतील तर त्या नागरिकांना संरक्षण देण्याची जबाबदारी सुद्धा राज्य शासन आणि पालिकेने घ्यायला हवी. त्याचाच भाग म्हणून दिवा शहरातील सर्वच बांधकामे अधिकृत करावेत अशी विनंती ज्योती पाटील यांनी केली आहे. दिवा शहरात मोठ्या संख्येने सर्वसामान्य नागरिक राहत आहेत. ते राहत असलेल्या इमारती अधिकृत केल्यास सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल.

त्याचबरोबर सदर इमारती अधिकृत करण्यासाठी शासनाने पुढाकार घेतल्यास शासनाला रजिस्ट्रेशन फी आणि अनधिकृत इमारती अधिकृत करण्यासाठी आकारण्यात येणारी नाममात्र फी यामुळे शासनाच्या महसुलात भर पडेल आणि हा प्रश्न निकालात निघेल असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे. नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने मानवतावादी दृष्टिकोनातून हा निर्णय घ्यावा असेही ज्योती पाटील यांनी म्हटले आहे.

## क्लस्टर योजना विकासकांना आंदण देऊ नका!

### आ. संजय केळकर यांनी नागरीकांसमवेत घेतली ठामपा प्रशासनाची झाडाझडती



**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील धोकादायक, अतिधोकादायक अन् अनधिकृत इमारती आणि झोपडपट्ट्याच्या पुनर्विकासासाठी क्लस्टर योजना क्रांतीकारक आहे. मात्र, आतबट्ट्याचे व्यवहार करून प्रशासनाने क्लस्टर योजना विकासकांना आंदण देऊ नका. असे परखड बोल आमदार संजय केळकर यांनी सुनावले आहेत. गुरुवारी आ. केळकर यांनी नागरीकांसमवेत ठाणे महापालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन विस्तृत चर्चा केली.

भाजप-शिवसेना युती सरकारच्या काळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरात क्लस्टर योजना राबवण्याचा निर्णय घेतला. (पान ५ वर)

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५ | पान : २
www.diwanews.com

# रजा कापण्याच्या भीतीने कर्मचाऱ्यांना लागली शिस्त

## जानेवारीत शिस्तीच्या परिक्षेत कर्मचारी पास

**ठाणे :** सरकारी नोकरी म्हणजे कधी या आणि कधी पण जा असाच गैरसमज तेथे काम करणाऱ्यांमध्ये पाहण्यास मिळतो. त्यातच ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि राजीव गांधी महाविद्यालया पाठोपाठ आरोग्य केंद्र आणि प्रसूतीगृहातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा हा गैरसमज दूर होऊन त्यांना शिस्त लागावी, यासाठी बायोमेट्रिक फेस रिडींग मशीन बसण्यात आली आहे. त्यामुळे अखेर २०२५ या नव्या वर्षातील जानेवारी महिन्यात शिस्त लागल्याचे प्रखरपणे दिसत आहे. मात्र नोव्हेंबर महिन्यात १०६ कर्मचाऱ्यांच्या ११५ तर डिसेंबर महिन्यात ४६ कर्मचाऱ्यांच्या ५० रजा कापण्यात आल्या होत्या. तीन दिवस उशिरा आल्यावर एक दिवसाची रजा कापण्यात येत असल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली.

ठाणे महानगर पालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना अधिक चांगल्या पद्धतीने व वेळेत उपचार मिळावे, यासाठी मध्यंतरी पालिका प्रशासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतले. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय आणि राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय यांची कार्यक्षमता वाढवणे, रुग्णांना जलद सेवा मिळणे आणि रुग्ण सेवेचा दर्जा उन्नत करणे, त्यातून रुग्णांना अधिक फायदा व्हावा या उद्देशाने विविध स्वरुपाची पावले उचलण्यात आली होती. डॉक्टर्स आणि वैद्यकिय कर्मचारी पूर्णवेळ उपस्थित राहिले तर रुग्णसेवा सक्षम होण्यास फार मोठी मदत होते. अनेकदा अनेक वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी वारंवार गैरहजर राहणे, वेळेवर कर्तव्यावर हजर न राहणे, आदी तक्रारीमुळे या ठिकाणी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली बसविण्यात आली. त्याचा चांगला फायदा झाल्याचे निर्दशनास आले.



# जेसीबीच्या धक्क्याने गॅसवाहिनी फुटली

## ५० ग्राहकांचा गॅस पुरवठा खंडीत

**ठाणे :** महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाची जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू असताना जेसीबीचा धक्का लागून महानगर गॅसवाहिनी फुटली आणि गॅस गळती होण्यास सुरुवात झाल्याची घटना घोडबंदर रोडवरील वाघबीळ नाका येथे समोर आली. या घटनेचा फटका त्या वाहिनीवरील ५० ग्राहकांना बसला.

वाघबीळ नाका येथे जेसीबीचा धक्का लागून गॅसवाहिनीला गळती सुरू झाल्याची माहिती सागर घोलप यांनी ठामपा आपत्ती व्यवस्थापन कक्षेला दिली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी महानगर गॅस कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. तसेच त्या गॅस वाहिनीचा मुख्य वॉल्व बंद केल्यानंतर दुरुस्तीचे काम महानगर गॅस कर्मचाऱ्यांनी हाती घेतले. याचदरम्यान गॅस वाहिनीवरील वाघबीळ नाका परिसरातील सुमारे-५० ग्राहकांचा गॅस पुरवठा खंडीत झाला होता. त्या गॅसवाहिनीच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर दुपारी २ वाजल्यानंतर त्या ग्राहकांचा गॅस पुरवठा पूर्ववत झाल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

# ठामपाच्या पाणी बिलांच्या वसुलीची सेंच्युरी

## सुमारे हजार थकबाकीदारांना पाठवल्या नोटिसा एकूण ९६०३ नळ जोडण्या केल्या खंडित

**ठाणे :** ठाणे महापालिकेने पाणी बिल थकबाकी वसुलीकरता सुरू केलेल्या धडक मोहिमेमुळे पाणी बील वसुलीची १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. गेल्याव र्षी याच काळातील वसुलीच्या तुलनेत १८ कोटी रुपयांची जास्त वसुली झाली आहे. त्याचबरोबर, आतापर्यंत संपूर्ण महापालिका क्षेत्रात ९६०३ नळ जोडण्या खंडित केल्या असून ४११ मोटर पंप जप्त केले आहेत. तसेच, ५४७ पंप रुम सील करण्यात आले आहेत. तर, ९९२३ थकबाकीदारांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

महापालिकेची पाणी बिल रक्कम सुमारे २२५ कोटी रुपयांच्या घरात आहेत. त्यापैकी, ७६ कोटी रुपये ही थकबाकी असून चालू वर्षाची बिल रक्कम ही १४८ कोटी रुपये आहे. एकूण बिलांच्या रकमेपैकी आतापर्यंत १०६ कोटी रुपयांची वसुली करण्यात आल्याची माहिती उपनगर अभियंता विनोद पवार यांनी दिली आहे. पाणी बिलाची थकबाकी न भरल्यास नळ जोडणी खंडित करून पाणी पुरवठा बंद करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याबाबत स्पष्ट निर्दे श दिले आहेत. तसेच, अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी या वसुलीबाबत सातत्याने आढावा घेत असल्याचेही पवार यांनी सांगितले पाणी बिलाच्या साप्ताहिक वसुलीचे लक्ष्य निर्धारित करून पाणी बिल वसुली अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार, पाणी बिलाच्या थकबाकीसह वसुलीसाठी महापालिकेच्या सर्व प्रभागात नळ जोडणी खंडीत करणे, मोटर पंप जप्त करणे, मीटर रुम सील करण्यात येत आहेत. तसेच, पाणी बिलाचा भरणा न करता, खंडित नळ जोडणी परस्पर पुन्हा कार्यान्वित करुन घेतल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. प्रभाग समितीतील पाणी पुरवठा विभागाच्या अभियंत्यांच्या नेतृत्वात पाणी बिल वसुलीची मोहीम राबविण्यात येत असून कारवाईत हयगय करू नये, असे त्यांना निर्देश देण्यात आले आहे. तसेच, पाणी बील वसुलीत हयगय करणारे अभियंता आणि लिपिक यांच्यावर शिस्तभंग तसेच वेतनवाढ रोखण्याची कारवाईही प्रस्तावित आहे. तरी, नागरिकांनी पाणी बिल वेळेत भरावे, तसेच थकबाकीदारांनी बील भरून पालिकेस सहकार्य करावे. अन्यथा नळजोडणी खंडित करण्यात येईल, असे उपनगर अभियंता (पाणी पुरवठा) विनोद पवार यांनी सांगितले.

महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळ संयोजनाच्या थकीत देयकाची चालू वर्षाच्या मागणीसह पूर्ण भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट लागू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे. ही योजना ३१ मार्च २०२५ या कालावधीत लागू राहील. या योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकारामध्ये १००%सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच, ही योजना व्यावसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# आम्हाला बेघर करताय तर आम्हाला फाशी द्या




# दिव्यातील 'त्या' रहिवाशांचा आक्रोश



**दिवा:-** हायकोर्टाच्या आदेशानंतर दिव्यातील तीन इमारतीवर कारवाई करण्यासाठी आलेल्या पालिका अधिकाऱ्यांचा निषेध येथील रहिवाशांनी आंदोलन करत केला.आमची घर खाली केली जाणार असतील तर आम्हाला फाशी द्या,अशा पद्धतीचा आक्रोश रहिवाशांनी यावेळी केला.

ज्या इमारतींवर हायकोर्टाच्या आदेशाने कारवाई होत आहे तेथील नागरिक मागील १८ वर्षांपासून या इमारतींमध्ये राहत आहेत पालिकेचा टॅक्स लाईट बिल पाणी बिल येथील नागरिक भरत असताना अचानक त्यांच्यावर कोसळलेल्या या संकटामुळे नागरिकांत संताप आहे हायकोर्टाने आदेश दिल्याने पालिका अधिकारी या ठिकाणी कारवाईसाठी आले होते त्यावेळी स्थानिक नागरिकांनी प्रशासनाचा जोरदार निषेध करत कारवाईला विरोध केला व प्रतिकात्मक स्वरूपात फाशीचे फलक लावून निषेध आंदोलन केले जर आमच्या घरांवर कारवाई होणार असेल तर आम्हाला फाशी द्या असा आक्रोश यावेळी नागरिकांनी केला.



## पालिकेने नागरिकांना दिलासा देण्यासाठी कायदेशीर तोडगा काढावा- विजय भोईर

**खरंतर या नागरिकांना योग्य तो तोडगा काढून दिलासा मिळण्याची गरज आहे.हायकोर्टाच्या आदेशाचा आदर ठेवून या ठिकाणी रहिवाशांना न्याय कसा देता येईल यासाठी पालिकेने पुढाकार घ्यायला हवा.१८ वर्षांपासून येथील रहिवासी या इमारतींमध्ये वास्तव्य करत आहेत. एका क्षणात सर्व उद्ध्वस्त होणार असेल तर त्याचा विचार पालिका प्रशासन शहराचे पालक म्हणून करणार आहे की नाही? हा प्रश्न आहे!**

# छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील छावा चित्रपट करमुक्त करावा-संजय वाघुले



**ठाणे :** धर्मवीर व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील छावा चित्रपट करमुक्त करावा, अशी मागणी भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. सद्यस्थितीत मल्टीप्लेक्स चित्रपटातील तिकिटाचे दर सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाला परवडणारे नसल्यामुळे चित्रपटावरील करमणूक कर रद्द करावा, अशी मागणी वाघुले यांनी केली आहे.

धर्मवीर व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे थोर व्यक्तिमत्व कोट्यवधी नागरिकांना प्रेरीत करणारे आहे. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्याचे व हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी अतुलनीय शौर्य दाखवून लढा दिला होता. अवघ्या ९ वर्षांच्या अल्प कारकिर्दीत अनेक संकटे झेलून केलेली कामगिरी तेजोमय होती. त्यांनी स्वराज्याच्या कारभाराबरोबर अभ्यासपूर्ण ग्रंथही लिहिले होते, असे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी पत्रात म्हटले आहे.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील छावा या हिंदी चित्रपटाचे नुकतेच प्रदर्शन करण्यात आले. या चित्रपटात छत्रपती संभाजी महाराजांची शौर्यगाथा व जीवनचरित्राबर अभ्यासपूर्ण प्रकाश टाकण्यात आला आहे. या चित्रपटात अंगावर शहारे आणणारे अनेक प्रसंग सादर करण्यात आले असून, उत्तम संवादही आहेत. या चित्रपटाच्या माध्यमातून नव्या पिढीमध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या विचारांचा प्रसार होण्यास मदत होणार आहे.

मात्र, शहरी भागातील अनेक मल्टीप्लेक्स चित्रपटगृहातील छावा चित्रपटाचे तिकीट सामान्य नागरिकांना परवडणारे नाही. त्यामुळे सामान्य नागरिक चित्रपटापासून दूर आहेत.यापूर्वी नरवीर तानाजी मालुसरे यांच्या जीवनावरील तानाजी हा हिंदी चित्रपट करमुक्त करण्यात आला होता. त्याच धर्तीवर छावा चित्रपट करमणूक करमुक्त करावा, अशी मागणी जिल्हाध्यक्ष संजय वाघुले यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५

www.diwanews.com

# केंद्र व राज्य शासनाच्या योजना सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने प्रभावीपणे कामकाज करावे –खासदार डॉ. श्रीकांत शिंदे




## जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची बैठक संपन्न

**ठाणे :** जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे अध्यक्षतेखाली मंगळवारी, १८ फेब्रुवारी, २०२५ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक संपन्न झाली. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव अशोक शिनगारे यांनी जिल्हा प्रशासन संदर्भातील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी मोलाची भूमिका बजावणार असल्याचे प्रास्ताविकात सांगितले.

जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जिल्ह्याचा विकास करण्यासाठी दिशा समिती बैठक आयोजित करण्यात आली असून योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी ही बैठक महत्त्वाची आहे. केंद्र सरकारच्या अंतर्गत राबविणाऱ्या योजना विविध विभागांना दर्जेदार पायाभूत सुविधांची कामे सुनिश्चित करून आणि योजना त्यांच्या इच्छित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले. तसेच स्वच्छ भारत मिशन अंतर्गत भिवंडी व उल्हासनगर शहरांमध्ये स्वच्छते संदर्भात कामकाज करण्यासाठी आराखडा तयार करून आणि निश्चित केलेल्या कालावधीत कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या.

यावेळी खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती नरेश गणपत म्हस्के, खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळ्या मामा – सुरेश गोपीनाथ म्हात्रे, विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे, विधानसभा सदस्य डॉ. बालाजी किणीकर, आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका डॉ. इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अतिरिक्त आयुक्त ठाणे महानगरपालिका प्रशांत रोडे, आयुक्त मीरा भाईंदर महानगरपालिका (प्रभारी) अनिलकुमार पवार, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका मनिषा आव्हाळे, आयुक्त भिवंडी निजामपूर महानगरपालिका अनमोल सागर, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी तसेच संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते. या बैठकीत पंतप्रधान आवास योजना शहरी (–), स्वच्छ भारत मिशन (), अटल मिशन फॉर रिजूवेनेशन एंड अर्बन ट्रांसफोर्मेशन, स्मार्ट सिटी मिशन, सर्व शिक्षा अभियान (), मिड-डे मील स्कीम या अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणी आणि संचालनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती नरेश गणपत म्हस्के यांनी दिशा समिती मार्फत जलद गतीने कामकाज पुर्ण करण्यासाठी सुचना दिल्या आणि केंद्र शासनाच्या ४५ योजना यशस्वीपणे राबवण्यासाठी पुढाकार घ्यावा तर घरकुल शहरी तसेच ग्रामीण भागात वेळेत पुर्ण होण्यासाठी तांत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा, असे मार्गदर्शन केले.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी दिशा समिती काम करत असते आणि यासाठी दिशा समितीमार्फत नियंत्रण असणे गरजेचे आहे. जल जीवन मिशन योजना, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण विभागातील कामकाज वेगाने होण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी पाठपुरावा करून कामकाज सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळ्या मामा– सुरेश गोपीनाथ म्हात्रे यांनी केले.

ठाणे ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या ४३१ ग्रामपंचायतींमध्ये भारत नेट प्रोजेक्ट व आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ऑनलाईन सेवा ग्रामीण भागात पुरविण्यासाठी प्रयत्नशील रहावे, यासंदर्भात विधान परिषद सदस्य निरंजन डावखरे यांनी मार्गदर्शन केले.

ठाणे जिल्ह्यातील वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय यांचे उद्देश निश्चित करून कामकाज वेळेत पुर्ण करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी मार्गदर्शन केले तर जिल्ह्यात पंतप्रधान आवास योजना शहरी (–) योजनेपासून कोणताही लाभार्थी वंचित राहणार नाही यांची दक्षता संबंधित विभागाने घ्यावी, अशा सुचना जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव अशोक शिनगारे यांनी आभार प्रदर्शन करताना सांगितले.




# कळव्याच्या सुश्मिता देशमुखचा पंजाबात डंका

**ठाणे:** कळव्यातील विटावा गावात राहणारी सुश्मिता सुनिल देशमुख हिने १९ फेब्रुवारी रोजी पंजाबात पार पडलेल्या ओपन क्लासिक पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेत १३६ किलो स्कॉट स्वतः च्या नावावर नोंदवत राष्ट्रीय विक्रमासह ३ सुवर्ण, १ कांस्यपदाची कमाई केली.

१९ फेब्रुवारी २०२५ रोजी, लव्हली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, फगवारा, पंजाब येथे पॉवर लिफ्टिंग इंडिया असोसिएशन यांच्या मान्यतेने, एसबीडी इंडियन ओपन क्लासिक पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ संपन्न झाली. या उल्लेख महाराष्ट्राची खेळाडू सुस्मिता सुनील देशमुख हिने उत्तम केली. सीनियर गटात, ५२ किलो वजनी गटात ती खेळली पण स्वतःचे वजन ४८.१६ किलो होते. ५२ किलो वजनी गटात स्कॅट या प्रकारात जुना विक्रम १३५ किलो होता, त्याला मोडून १३६ किलो स्कॉट स्वतःच्या नावावर नवीन विक्रम बनवला.

तसेच स्कॅट या प्रकारात सुवर्णपदक, बेंचप्रेस या प्रकारात सुवर्णपदक डेडलिफ्ट या प्रकारात कांस्य पदक तसेच ३४६ किलो वजन वजन ५२ किलो वजनी गटात (राष्ट्रीय विजेते) सुवर्णपदक पटकावले, या ठिकाणी सुस्मिता देशमुख हिने १ राष्ट्रीय विक्रम, ३ सुवर्णपदक आणि १ कांस्य पदक कमाई केली.

या आधी सोलापूर येथे झालेल्या सीनियर महाराष्ट्र राज्य पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप मध्ये महाराष्ट्राची सर्वोत्तम महिला खेळाडू २०२५ तसेच सुवर्णपदक पटकावले होते. तिच्या या यशाचे श्रेय प्रशिक्षण निलेश नामदेव भोईर, आई–वडील वंदना सुनिल देशमुख, सुनिल आत्माराम देशमुख यांना ती देते. मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक विक्रमांना गवसणी घालणाऱ्या सुश्मिता देशमुख हिला राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. हॉंगकॉंगला आंतरराष्ट्रीय ओपन पॉवरलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेतही तिची निवड झाली होती. मात्र आर्थिक अडचणीमुळे ती या स्पर्धेत भाग घेवू शकली नाही. सुश्मिता देशमुखसारख्या राष्ट्रीय – आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्रासह देशाचा नाव उज्वल करणाऱ्या या खेळाडूंना आर्थिक पाठबळ मिळणे आवश्यक आहे.





# ओमकारेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा उत्साहात संपन्न



**साबे :–** साबे गावातील डीजी कॉम्प्लेक्स येथे सामाजिक कार्यकर्ते निलेश पाटील यांच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या ओमकारेश्वर मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा व प्राणप्रतिष्ठा सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.ओमकारेश्वर मंदिर जीर्णोद्धार सोहळा व प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला प्रभागातील मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.




---

# क्लस्टर योजना विकासकांना आंदण देऊ नका!

(पान १ वरून)

त्यानुसार पालिका क्षेत्रात विविध भागात ४८ नागरी पुनर्निर्माण आराखडे तयार करण्यात आले. क्लस्टर सारख्या महात्वाकांक्षी योजनेला मूर्त स्वरूप मिळत असताना शहरातील मानपाडा, अशोक नगर, आझादनगर, गणेश नगर तसेच मनोरमा नगर भागात कार्यालय थाटुन दंडेलशाही करणाऱ्या विकासकाच्या विरोधात नागरीकांमध्ये क्लस्टर बाबत संभ्रमाचे वातावरण आहे. यापूर्वी अधिवेशनात आ. केळकर यांनी अशा हजारो झोपडीधारकांची बाजू ठामपणे मांडली असल्याने या भागातील नागरीकांनी क्लस्टर संदर्भातील तक्रारींचा पाढा आ. संजय केळकर यांच्याकडे वाचला. त्यानंतर, गुरुवारी आ. केळकर यांनी नागरीकांसह थेट ठाणे महापालिका मुख्यालयात संबधित अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी, नागरिकांनीही अधिकाऱ्यांकडे क्लस्टर संदर्भातील शंका मांडल्या. यावर अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि अन्य अधिकाऱ्यांनी वस्तुस्थिती मांडल्यानंतर क्लस्टर साठी झोपड्यांचे सर्वेक्षण म्हणजे अंतिम मंजुरी नसल्याचा विश्वास रहिवाश्यांना दिला. तसेच क्लस्टरविषयी शंका असेल तर प्रशासनाने जाहिर सभा अथवा बैठका घेऊन रहिवाश्यांचे शंका निरसन करावे. त्याचबरोबर वैयक्तिक पातळीवरही तक्रारदारांच्या तक्रारी ऐकुन घ्याव्यात. असे सक्त निर्देश देत क्लस्टर योजना विकासकाला आंदण देऊ नका, असे प्रशासनाला बजावले.

# अनधिकृत बांधकाम हटवण्यात सहाय्यक आयुक्तांनी कोणतीही हयगय करू नये

## ठामपा आयुक्त सौरभ राव यांचे स्पष्ट निर्देश

**ठाणे :** प्रभाग समितीच्या बीट डायरीत नोंदण्यात आलेली सर्व अनधिकृत बांधकामे तोडण्यात सहाय्यक आयुक्तांनी कोणतीही हयगय करू नये. सर्व यंत्रणा आणि मनुष्यबळ लावून ही बांधकामे पूर्णपणे तोडण्यात यावीत, असे स्पष्ट निर्देश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले. अनधिकृत बांधकामाच्या निष्कासनासाठी सर्वस्वी नवीन पद्धती स्वीकारावी लागेल असे स्पष्ट केले.

ठाणे महापालिका क्षेत्रात सर्व प्रभाग समिती क्षेत्रात मिळून ७६९ अनधिकृत बांधकामे आहेत. त्यापैकी ६६३ अनधिकृत बांधकामांची नोंद प्रभाग समितींच्या बीट निरिक्षकांनी बीट डायरीत केलेली आहे. ही सर्व बांधकामे, पक्की, अर्धी पक्की, कच्ची कोणत्याही स्वरुपाची असली तरी ती तत्काळ तोडून टाकावीत, असे महापालिका आयुक्त राव यांनी स्पष्ट केले.

तोडकाम करताना, पोलीस बंदोबस्त मिळाला नाही, स्थानिकांचा विरोध होता, दबाव आला अशा प्रकारची कोणतीही कारणे न सांगता अनधिकृत बांधकामांचे निष्कासन झाले पाहिजे. त्याची संपूर्ण जबाबदारी सहा. आयुक्तांची राहील. त्यांना त्यासाठी आवश्यक ते सर्व मनुष्यबळ, यंत्रणा उपलब्ध करून दिली जाईल. त्यासाठी इतर आवश्यक सहकार्य परिमंडळ उपायुक्त करतील.

अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आपण कसूर करीत आहोत असे चित्र निर्माण होणे आपल्याला भूषणावह नाही. आपल्या पदनिर्देशित कर्तव्याचे पालन आपल्याला करावेच लागेल. न्यायालयांनी त्यासंदर्भात दिलेल्या आदेशांचे विनाविलंब पालन केले जावे. त्याची कायदेशीर प्रक्रिया वेळेत पूर्ण केली जावी, असेही निर्देश आयुक्त राव यांनी दिले. अनधिकृत बांधकामांवरील कारवाईचा आढावा घेण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी आयुक्तांच्या दालनात वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली. या बैठकीस, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, विधी अधिकारी मकरंद काळे, उपायुक्त मनीष जोशी, शंकर पाटोळे, दिनेश तायडे, उपनगर अभियंता विनोद पवार, यांच्यासह सर्व सहाय्यक आयुक्त उपस्थित होते.

अनधिकृत बांधकामाची बीट डायरीत नोंद झाली की सहाय्यक आयुक्तांनी तेथे स्थळ पाहणी केलीच पाहिजे. तसेच, तोडकाम करताना स्वत: उपस्थित राहिले पाहिजे. अनधिकृत बांधकामात टप्याटप्याने वास्तव्य सुरू झाले की त्याचे निष्कासन आणखी अवघड होते, असेही आयुक्त म्हणाले. या बैठकीत, सहाय्यक आयुक्तांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्यास कारवाई करण्यात येईल. या पदावर काम करायचे असेल तर सर्व दबाव दूर सारून काम करावे लागेल. अनधिकृत बांधकामांविषयी न्यायालयाने अतिशय कठोर भूमिका घेतली असून कामाच्या पद्धतीवरही टिपणी केलेली आहे. सबब सांगण्याच्या प्रकारावरही न्यायालयाने आक्षेप घेतला असल्याची माहितीही या बैठकीत देण्यात आली.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५

www.diwanews.com

# संगमेश्वर तालुक्यासह जिल्ह्यातील रखडलेल्या जलजीवन मिशन योजना उन्हाळ्याआधी पूर्ण करा

**संगमेश्वर:–** संगमेश्वर तालुक्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील जल जीवन मिशन योजनेची रखडलेली कामे आगामी उन्हाळ्याआधी पूर्ण करण्यासाठी संबंधित जिल्हा व तालुका अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत स्तरावर लक्ष घालावे अशी मागणी गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड यांनी केली आहे.

## नागरिकांना पाणीटंचाई भेडसावल्यास पाणीपुरवठा विभागाचे श्राद्ध घालणार

## गाव विकास समितीचे अध्यक्ष उदय गोताड यांचा इशारा

प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी मिळावे या चांगल्या उद्देशाने केंद्र सरकारने जल जीवन मिशन योजना राबवली मात्र या चांगल्या योजनेचा बट्ट्या बोल करण्याचे काम अनेक भागात सुरू असून नागरिकांना घरपट नळ कनेक्शन अद्यापही मिळालेली नाहीत. ज्या पद्धतीने या योजनेची कामे काही भागात सुरू आहेत ते पाहता जलजीवन मिशन योजना ही पैसे कमाऊ मिशन योजना झाली आहे काय असा प्रश्न पडतो.खरंतर जिल्हा आणि तालुकास्तरावरील पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून ग्रामपंचायत स्तरावर नागरिकांना मुबलक पाणी पुरवठा होण्यासाठीचे नियोजन केले जाते का याची पाहणी करणे आवश्यक होते. मात्र स्वतः खुर्च्या उबवणाऱ्या अधिकाऱ्यांनी या चांगल्या योजनेचा फज्जा उडवण्यासाठी पुढाकार घेतलाय का असा प्रश्न पडतो असेही उदय गोताड यांनी म्हटले आहे. आगामी उन्हाळ्याआधी संगमेश्वर तालुक्यासह रत्नागिरी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ज्या गावांमध्ये जलजीवन मिशन योजना अद्यापही अपूर्ण आहेत त्या पूर्ण करण्यासाठी चे प्रयत्न संबंधित तालुका अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांनी करावेत अशी विनंती उदय गोताड यांनी केली आहे.

### जल जीवन मिशन योजना असतानाही या उन्हाळ्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास पाणीपुरवठा विभागाचे गाव विकास समितीच्या माध्यमातून श्राद्ध घालणार

### अध्यक्ष उदय गोताड यांचा इशारा

जर यावर्षी उन्हाळ्यात रत्नागिरी जिल्हा व संगमेश्वर तालुक्यातील नागरिकांना पाणीटंचाईची समस्या भेडसावली तर पाणीपुरवठा विभागाचे श्राद्ध गाव विकास समितीच्या माध्यमातून घालण्यात येईल असा इशाराही उदय गोताड यांनी दिला आहे. जलजीवन मिशन योजना या चांगल्या पद्धतीने राबवून रत्नागिरी जिल्ह्यातील नागरिकांना दिलासा देणे अपेक्षित आहे. नागरिकांना घरपट नळ कनेक्शन देऊन मुबलक पाणी या योजनेतून देणे अपेक्षित असताना ज्या ठिकाणी जलजीवन मिशन योजना फेल ठरतील त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर टाकावी असेही उदय गोताड यांनी म्हटले आहे. जर आगामी उन्हाळ्यामध्ये संगमेश्वर तालुक्यासह रत्नागिरी जिल्ह्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास यावर्षी पाणीपुरवठा विभागाचे श्राद्ध गाव विकास समिती मार्फत घालण्यात येईल असा इशाराही उदय गोताड यांनी दिला आहे.

# मूर्तीकारांनी शाडू माती आणि जागेसाठी अर्ज करावा - ठाणे महापालिकेचे आवाहन

## महापालिका देणार विनामूल्य शाडू माती, मूर्ती घडविण्यासाठी जागा

**ठाणे :** पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासाठी मूर्तीकारांना ठाणे महापालिकेतर्फे शाडूची माती आणि मूर्ती घडविण्यासाठी जागा विनामूल्य देण्यात येणार आहे. मातीची उपलब्धता आणि प्रभागनिहाय जागांचे नियोजन करण्यासाठी, मूर्तीकारांनी शाडूची माती मिळवण्यासाठी पुढील १५ दिवसात ठाणे महापालिकेकडे मागणी नोंदवावी. तसेच, जागेसाठी अर्ज करावा, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.



पर्यावरण पूरक गणपती साजरा करण्यासाठी ठाणे महापालिकेने आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार मूर्तीकार तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांची १६ जानेवारी रोजी बैठक घेतली. तसेच, ०३ फेब्रुवारी रोजी पर्यावरण पूरक गणेशोत्सव नियमावली २०२५ ही प्रसिद्ध करण्यात आली आहे. या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार, मूर्तीकारांनी शाडूच्या मातीची मागणी तसेच जागेसाठी अर्ज लवकरात लवकर करावा. त्यानुसार, पर्याप्त वेळेत शाडूची माती उपलब्ध करणे शक्य होईल. तसेच, जागांसाठी अर्ज आल्यावर त्यानुसार प्रभागनिहाय जागा शोधून त्या मूर्तीकारांना मूर्ती घडविण्यासाठी विनामूल्य देता येतील, असे मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी सांगितले.

शाडूच्या मातीसाठी ठाणे महापालिका मुख्यालय, पाचपाखाडी येथील प्रदूषण नियंत्रण विभाग आणि जागेसाठी संबंधित प्रभाग समिती कार्यालय येथे अर्ज करावा लागणार आहे. तरी संबंधित मूर्तीकारांनी या दोन्ही गोष्टी पुढील १५ दिवसांत कराव्यात, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५
पान : ७
www.diwanews.com

# रायगड हादरले, भूकंपाचे सलग दोन दिवस धक्के



**रायगड** : गेले सलग दोन दिवस रायगड जिल्ह्यातील पेण व सुधागड तालुक्यात भूकंपाचे धक्के बसले आहेत. या अचानक उद्भवलेल्या संकटामुळे येथील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

बुधवारी रात्री येथील नागरिक झोपेत असतानाच अचानक नागरिकांना भूकंपाचे धक्के जाणवले. अनेकांच्या घरातील वस्तु तसेच भांडी वगैरे हलायला लागली. रात्रीची वेळ असल्यामुळे नागरिकांना काही न सुचल्यामुळे त्यांची धावपळ सुरू झाली. काहीच्या घराच्या काचाही तडकल्या त्यामुळे नागरिक भीतीने घराबाहेर पळत सुटले. हा भूकंप कशामुळे झाला आहे. तसेच या भूकंपाचा केंद्रबिंदू कोठे आहे हे असून समजलेले नसले तरी रायगडवासियांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

रायगडच्या सुधागड तालुक्यातील गावांमध्ये सकाळीच भूकंपाचे धक्का बसला होता. सुधागड तालुक्यातीच्या तहसीलदारांनी मात्र या गावांना लागलीच भेट दिली. या भूकंपात कोणतीही जीवितहानी झाली नसल्याचे समजते. तसेच या भूकंपात कोणतीही मोठी वित्तहानी झाली नसल्याचे सांगितले जात आहे.

# बांगलादेशी घुसखोरांविरोधात शोध मोहीम सुरूच

**ठाणे** : गेल्या काही दिवसांपूर्वी हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रख्यात अभिनेता सैफ अली खान याच्यावर झालेला हल्ला व हल्ला करणारा बांगला देशी असल्याचे समजल्यानंतर सुरक्षिततेच्या दृष्टीने सरकारने बांगला देशी यांची शोध मोहीम सुरू केली आहे. या शोध मोहीमेत सापडलेल्या बांगलादेशींना हुसकवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आता त्यांची शोध मोहीम सुरू झाली आहे.

अवैधरित्या भारतात प्रवेश करणाऱ्या बांगलादेशी घुसखोरांची संख्या वाढतच चालली आहे. त्यातच होणारे घातपात तसेच चोऱ्यांच्या घटनेत वाढ होत आहे. ही बांगलादेशींची घुसखोरी एक मोठे संकट बनले आहे. यांच्या वाढीवर रोख ठेवण्यासाठी म्हणून यांना देशाच्या बाहेर घालवण्याच्या सूचना भारत सरकारने पोलीसांना दिल्या आहेत. यासाठी ठाणे शहर व जिल्ह्यात पोलीसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. रस्ते-पदपथ यावर व्यवसाय करणारे, हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांची तसेच बांधकाम व्यवसायात काम करणाऱ्यांच्या कामगारांची कसून तपासणी होत आहे. ही शोध मोहीम राबवित असताना त्यांना सुमारे सव्वा दोनशे बांगलादेशींची ओळखपरेड घेण्यात आली आहे. ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या परिसरातही शोध मोहीम घेण्यात आल्याचे सांगितले. पोलीस प्रशासनाने आवाहन ही केले आहे की, बांगलादेशी घुसखोरांबद्दल कोणाकडे माहिती असल्यास नागरिकांनी पोलिसांशी संपर्क साधावा. त्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल असे आश्वासनही देण्यात आले आहे.



दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २४ फेब्रुवारी २०२५


# जाणता राजा मित्र मंडळा तर्फे दिव्यात शिवजयंती मोठ्या उत्साहात संपन्न




**दिवा:-** दिव्यातील जाणता राजा मित्र मंडळ तर्फे शिवजयंती उत्सव, सत्यनारायणाची महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. हे या मंडळाचे ९ वे वर्ष असून या वर्षी मोठ्या दिमाखात हा सोहळा पार पडला.

कालच्या दिवशी सत्यनारायण पुजेच्या वेळी होमहवन ही करण्यात आले. नंतर मंडळातील सर्व महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम आणि लकी ड्रॉ ही ठेवण्यात आला होता. सकाळी लवकर महाराजांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत पुजा केली. तर नंतर आलेल्या शिवज्योत व पालखीचे ही उत्साहात पुजा केली गेली. त्यानंतर संध्याकाळी लहान मुलांचे पोवाडे, नृत्याचे कार्यक्रम पार पडले. तर क्षत्रिय घाडीगावकर मराठा समाज तर्फे मंगळागौरचे उत्कृष्ठ सादरीकरण करण्यात आले. तसेच संजय डान्स अकॅडमी तर्फे विविध नृत्यांचे सादरीकरण झाले.

या जाणता राजा मित्र मंडळाचे अध्यक्ष समीर चव्हाण, खजिनदार राजेंद्र आंब्रे, प्रशांत चव्हाण, उपाध्यक्ष उदय सावंत, विघ्नेश सुर्वे, प्रतीक विचारे, अभिजीत सुर्वे, सुशांत अर्थपुरे, ऋषिकेश लोके, आदित्य लोके, प्रियेश जाधव, निशांत कुडतरकर, चंद्रशेखर गौडा, अजय जाधव, महिंद्रा आंब्रे, यशवंत गौडा, नारायण चव्हाण, रामचंद्र आंब्रे, सद्गुरु निरावडेकर, दिनेश सावंत, दिनेश मोंडे, मुकेश परमार, सुनील चव्हाण, अरविंद ढेकळे, विक्रांत कदम, रोहन सावंत, अतिश साळगावकर, प्रशांत अर्धापूर, सुदर्शन कदम समस्त महिला वर्ग , या कार्यक्रमास प्रमुख मान्यवर कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे, भाजपा ठाणे जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, भाजप ठाणे जिल्हा सरचिटणीस विलास साठे, ठाणे जिल्हा चिटणीस विजय भोईर, चेतन पाटील, दिवा शहराध्यक्ष सचिन भोईर, शिवसेना शहर प्रमुख रमाकांत मढवी, शिवसेना कल्याण तालुकाप्रमुख महेश पाटील, रेल्वे महासंघ अध्यक्ष लताताई अरगडे, दिवा .. वरिष्ठ अधिकारी गिरीशचंद्र तिवारी, ठाणे जिल्हा कार्यकारणी सदस्य रोशन भगत, गणेश भगत, दिलीप भोईर,सतीश केलशीकर ,भाजपा महिला मोर्चा अध्यक्ष सपना भगत, उबाठा शहर संघटक रोहिदास मुंडे, उबाठा दिवा शहर प्रमुख सचिन पाटील, ज्योती पाटील, नवनीत पाटील, शिवसेना विभाग प्रमुख उमेश भगत, भालचंद्र भगत, अंकुश मढवी, श्रीधर पाटील, सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी सेवाभावी संस्थेतील सर्व पदाधिकारी व इतर दिव्यातील शिवजयंती मंडळांची देखील उपस्थिती लाभली.

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२

# ठाणे जिल्ह्यातील १७ हजार ९७५ घरकुल पात्र लाभार्थींना मंजूरी पत्र वितरण

**ठाणे:** ‘‘सर्वांसाठी घरे‘‘ या धोरणांतर्गत ‘‘प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२‘‘ अंतर्गत शनिवारी २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री, देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते राज्यातील २० लाख लाभार्थींना मंजुरी पत्र वितरण, १० लाख लाभार्थ्यांना एका क्लिकमध्ये पहिला हप्ता दूरदृष्यप्रणालीद्वारे करण्यात आले.

त्यानुषंगाने ठाणे जिल्हयात प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत १८ हजार २४८ चे उद्दिष्ट असून यापैकी एकूण १७ हजार ९७५ घरकुल पात्र लाभार्थींना तालुकानिहाय मंजुरी पत्र प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय,ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हास्तरावर प्रातिनिधीक स्वरूपात

१५ लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरण करण्यात आले. त्याचबरोबर सर्व पात्र लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरण करण्यात आले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) पहिल्या टप्प्यातील घरकुलाचे काम उत्तम प्रकारे पूर्ण केलेल्या तीन लाभार्थ्यांना घरकुलाच्या चावीची प्रतिकृती देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, सहाय्यक आयुक्त (पुनर्वसन) अमोल यादव, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत विभाग) प्रमोद काळे तसेच या योजनेचे लाभार्थी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यात ठाणे जिल्ह्यातील घरकुलांचे काम उत्तम प्रकारे केले आहे. आज राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात कार्यक्रम सुरू आहे आणि प्रत्येक ग्रामपंचायतींमध्ये मंजुरी पत्र वितरण कार्यक्रम सुरू आहे. प्रत्येक व्यक्तीचे स्वतःचे घर असणे महत्त्वाचे आहे. यामुळे लाभार्थ्यांनी दर्जेदार, उत्कृष्ट घरकुल तयार करण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून देण्यासाठी व मयत झालेल्या लाभार्थींच्या कुटुंबासाठी प्रशासनाने तसेच लाभार्थ्यांनी जोमाने काम करावे, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी मार्गदर्शन करताना केले.

घरकुल नोंदणी, मंजुरी यासाठी ठाणे जिल्हा महाराष्ट्रात अग्रेसर आहे. ग्रामस्थांना स्वप्नातील घर पूर्ण करण्यासाठी प्रशासन कटीबद्ध आहे. घर मिळवून देण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन तसेच जिल्हा परिषद मार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात आली आहे. जिल्हा प्रशासन ज्या पध्दतीने काम करीत आहे, त्यासाठी लाभार्थ्यांनी देखील घर बांधणी वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी याप्रसंगी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे म्हणाले की, घरकुल नोंदणी व मंजुरी करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी मिशन मोडवर केवळ ७ दिवसात कामकाज पूर्ण केले आहे, यासाठी त्यांनी विभागाचे कौतुक केले. तसेच लाभार्थ्यांनी त्यांना मंजूर झालेली घरे लवकरात लवकर पूर्ण करावीत,अशा शुभेच्छा दिल्या.

ठाणे जिल्हयामध्ये मंजुरी पत्र वितरण व प्रथम हप्ता वितरण कार्यक्रम जिल्हास्तर, तालुकास्तर तसेच ग्रामपंचायत स्तरावर आयोजित करण्यात आला होता. यावेळी १७ हजार ९७५ पात्र लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वितरीत व लाभार्थ्यांना पहिला हप्ता एका क्लिकवर वितरीत करण्यात आला आहे.